नियमित दिवाणी दावा क्र.२८८/२०२२
मधुकर व ईतर वि. शोभा व ईतर
सी.एन.आर.क्र.एम.एच.जे.न.०८०००९६८–२०२२

## निशाणी क्र.०५ खालील आदेश

(दिनांक ०७/०२/२०२३)

प्रस्तुत अर्ज वादींनी न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादींनी असे कथन केले की, वादींनी मुळ दावा प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण काढणेसाठी व त्याचा ताबा मिळणेसाठी दाखल केले आहे. वादींची मौजे कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.४०६ एकुण क्षेत्र ०२ हे. ८१ आर पैकी वादी क्र. १ ची ८० आर व वादी क्र २ ची ८१ आर. अशी एकूण मिळून १ हे. ६१ आर. शेतजमीनीची चतुःसिमा पुर्वेस प्रतिवादी क्र.४ विठ्ठल पि. शाहूराव कंटूले यांची गट क्र. ४०६ मधील जमीन, पश्चिमेस कुंभार पिंपळगाव ते राजाटाकळी रोड, दक्षिणेस प्रतिवादी क्र १ ते ३ ची गट क्र. ४०३ मधील जमीन आणि उत्तरेस प्रतिवादी क्र. ५ गणेश भगवान कंटूले यांची गट क्र. ४०७ मधील जमीन वादींच्या मालकीची व ताब्याची आहे. सदरील जमीनीवर प्रतिवादींनी बेकायदेशीररित्या अतिक्रमण केलेले आहे.

३) वादींनी असे कथन केले की, प्रतिवादींनी वादीच्या मालकीच्या जमीनीवर केलेले अतिक्रमण निश्चित करुन त्याचा ताबा वादीस मिळणे गरजेचे आहे. त्याकरीता भुमीअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणूक व्हावी, अशी विनंती वादीने केली.

४) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना समन्सची बजावणी होवुन सुध्दा ते दाव्यात हजर झाले नाही. त्यामुळे दि.२४.०१.२०२३ रोजी निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे.

५) अर्जाचे अवलोकन केले. वादी तर्फे ॲड. श्री. आर.टी. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

६) प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादीने दाखल केलेल्या गट क्र.४०६ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, त्यावर वादींचे व प्रतिवादी क्र.४ विठ्ठल पि. शाहूराव कंटूले नावे नमुद आहे. तसेच गट क्र. ४०६ च्या दक्षिण बाजूने

स्थित गट क्र. ४०३ व उत्तर बाजूस स्थित गट क्र.४०७ च्या ७/१२ उता–यावर इतर प्रतिवादींचे नाव नमूद आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादींनी गट क्र.४०६ मधील त्यांच्या मालकीची व ताब्यातील १ हे. ६१ आर. शेतजमीन अतिक्रमणीत क्षेत्र निश्चित करणेसाठी न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्तीची विनंती केली आहे. सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | उपअधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय, घनसावंगी ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. |
| २ | न्यायालयीन आयुक्ताने मौजे कुंभारपिंपळगाव, ता. घनसावंगी जि. जालना येथील गट क्र.४०६ एकुण क्षेत्र ०२ हे. ८१ आर पैकी वादी क्र. १ ची ८० आर व वादी क्र. २ ची ८१ आर. अशी एकूण मिळून १ हे. ६१ आर. शेतजमीन या मिळकतींच्या संपूर्ण क्षेत्रफळाची मोजणी भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल न्यायालयात दिनांक ३१/०३/२०२३ पावेतो सादर करावा. |
| ३ | मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी. |
| ४ | न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा. |
| ५ | न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे. |

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2023.02.09 11:15:47 +0530

दिनांक ०७/०२/२०२३

**(एन. व्ही. साहु)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.